**निवडणूक तात्काळ**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
निवडणुकांकरिता ईव्हीएममध्ये पांढऱ्या
रंगाच्या मेमरीचा वापर करण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ२०१३/जुमेमा/प्र.क्र.२/का.१२
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०००३२
दिनांक:-१८ /०६/२०१३

## -:आदेश:-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाच्या जुन्या रिफर्बिश केलेल्या ३१८०० तसेच नव्याने खरेदी केलेल्या ४४२५० इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये पांढऱ्या रंगाच्या काढता येणाऱ्या मेमरी (DMM) वापरण्यात आल्या आहेत. सदर मेमरींवर एक बार कोड क्रमांक देण्यात आला आहे. या नवीन सुधारित इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये जुन्या काळया/ निळया रंगाच्या मेमरी वापरल्यास सदर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र काही मते नोंदविल्यानंतर बंद पडते व त्यामधील नोंदविलेल्या मतांचा निकाल पाहणे अशक्य होते. अलिकडे पार पडलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये काही ठिकाणी पुर्वीच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमधील शिल्लक असलेल्या काळया/ निळया रंगाच्या मेमरींपैकी काही मेमरी वापरल्या गेल्या असून त्यामुळे मतदान सुरू असतांना काही ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बंद पडल्याचे निदर्शनास आले आहे.

२. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता राज्य निवडणूक आयोग असा आदेश देत आहे की, "**भविष्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये पांढऱ्या रंगाच्या काढता येणाऱ्या मेमरीचाच (DMM) वापर करावा. कोणत्याही परिस्थितीत काळया/निळया रंगाच्या मेमरीचा वापर होणार नाही याची संबंधीत अधिकाऱ्यांनी खबरदारी घ्यावी.**"

मा.राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त तथा प्रभारी उप आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

१) जिल्हाधिकारी, (सर्व)
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
४) मुख्याधिकारी, नगर परिषदा/ नगर पंचायती (सर्व)
५) मा.आयुक्त यांचे स्वीय सहायक
६) प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक
७) आयोगातील सर्व कार्यासने
८) निवड नस्ती